REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# भारतातील दारिद्रय आणि आर्थिक वृध्दी एक दृष्टीक्षेप

राजरत्न भिमराव पोहेकर[1] , डॉ.सुरेश बी. ढाके[2]
[1]संशोधक विद्यार्थी , उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव.
[2]विभाग प्रमुख अर्थशास्त्र , कला वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, महिला महाविद्यालय,डोंगर कठोरे, ता यावल जि जळगांव.

**गोशवाराः**

प्रस्तूत शोध निबंधामध्ये भारतातील दारिद्रय व आर्थिक वृध्दी या दोन मुद्यांना येऊन दृष्टीक्षेप टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून 70 वर्षे पूर्ण होत आहेत तरी भारत दारिद्रय मुक्त झाला नाही. एकी कडे भारताचा आर्थिक वृध्दी दर वाढत आहे. आपण तो दोन अंकी होण्याची अपेक्षा करत आहेत येणाऱ्या काळात तो दोन अंकी होईल परंतू भारतातील दारिद्रय, कुपोषण बेरोजगारी या समस्या संपत नाहीत. याचे कारण काय याचा शोध घेण्याचा प्रस्तूत शोध निबंधात प्रयत्न करण्यात आला आहे.



**प्रस्तावनाः**

भारतीय लोकसंख्येचा विचार केल्यास 2011 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या 121 कोटी आहे. सी रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली मे 2012 मध्ये सी. रंगराजन पॅनल स्थापन करण्यात आले. त्यामध्ये महेद्र देव, के सुंदरम, महेश व्यास आणि के दत्ता या अर्थतज्ज्ञांचा समावेश करण्यात आला. या पॅनल ने दारिद्रयरेषा ठरविणाऱ्या सुरेश तेंडूलकर गटावर प्रचंड टिका करण्यात आली म्हणून दारिद्रयची नविन रेषा ठरविण्यासाठी स्थापन करण्यात आली. या पॅनलने 2011– 12 साठी दारिद्रय रेषा ठरविली. देशामध्ये 29.6 टक्के लोक दारिद्रय रेषेखाली असल्याचे सांगितले 121 कोटी पैकी 29.6 टक्के म्हणजे देशातील 35 कोटी 56 लाख लोक दारिद्रय रेषेखाली जीवण जगत आहेत. या पेक्षा भयानक स्थिती म्हणजेच अर्जून सेन गुप्ता यांनी दिलेला अहवाल होय. अर्जून सेन गुप्ता यांच्या अहवालानुसार देशातील 83 कोटी लोकांकडे 6 ते 20 रूपया पर्यंत दरडोई उत्पन्न आहे म्हणजेच ऐवढे लोक दारिद्रयाचे जीवन जगत आहेत.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत देशात अन्नधान्य, बेरोजगारी आणि गरिबी म्हणजेच दारिद्रय हे भीषण प्रश्न बनले आहे त्यामूळे 1971 ला तत्कालीन प्रधानमंत्री इंदीरा गांधी यांनी संसदीय निवडणूकी वेळी गरीबी हटाव ही घोषणा चौथ्या पंचवार्षिक योजनेत केली. याचा परिणाम असा झाला की, नियोजन मंडळाने दारिद्रय निर्मूलन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. भारत सरकारने रोजगार निर्मिती दारिद्रय निर्मूलनाचे सर्वात महत्वाचे साधन असल्याने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दारिद्रय निर्मूलन रोजगार निर्मितीसाठी विविधांगी प्रयत्न केले आहे. त्यामध्ये 1973–74 ला आवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम, 1975ला 20 कलमी कार्यक्रम, 1980 एकात्मीक ग्रामीण विकास कार्यक्रम, 1989 ला जवाहर रोजगार योजना, 1999 ला जवाहर ग्राम समृध्दी योजना, 1985–86 ला इंदिरा आवास योजना, 1997 ला स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना, 1999 ला स्वर्ण जयंती स्वरोजगार योजना, 2005 ला राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना त्याच प्रमाणे 2009 ला राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान व आता अन्न सुरक्षा कायदा इत्यादी. यामध्ये आणखी काही योजना व कार्यक्रम सांगता येतील परंतु सरकारचे दारिद्रय निर्मूलन कार्यक्रम इत्यादी दिलेल्या योजनांनी लक्षात येईल. प्रश्न असा पडतो की, एवढे सारे शासनाने प्रयत्न करून भारत दारिद्रय मुक्त का झाला नाही. याचा ऊहापोह आपणाला करावा लागेल.

## उद्दिष्ट्ये :

1 भारतातील दारिद्र्याच्या स्थितीचा अभ्यास करणे
2 भारत सरकारच्या दारिद्र्य विषयक योजना, धोरण व नितीचा आढावा घेणे.

## संशोधन प्रध्दती:

प्रस्तूत शोध निबंध हा द्वितीय साधन सामग्रीवर आधारीत आहे. यामध्ये विविध शासनाचे अहवाल, मासीके वृत्तपत्र, साप्ताहीक, विविध संशोधकाचे लेख, व इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला.

## भारतातील दारिद्र्य आणि आर्थिक वृध्दीचा विरोधाभास :

भारताच्या आर्थिक वृध्दी दराचा विचार केल्यास 12 व्या पंचवार्षीक योजनेत 8 टक्के आर्थिक वृध्दी दर उद्दिष्ट्ये ठेवण्यात आले. 11 व्या योजनेची उपलब्धी ही 8.2 टक्के आहे. पहिल्या योजनेत भारताचा वृध्दी दर फक्त 3.6 टक्के होता. भारताचा आर्थिक वृध्दीदर वाढत आहे. याचा अर्थ भारताचा विकास होत आहे. हे स्पष्ट आहे. पण विकास करत असलेल्या भारतात अर्जूनसेन गुप्ता यांच्या अहवालानुसार 83 कोटी लोक दारिद्र्याचे जीवन जगत आहेत. तर सी रंगराजन यांच्या पॅनल नुसार 368300000 लोक दारिद्र्याचे जीवन जगत आहेत. हे आपल्याला पुढील तक्त्याच्या आधारे स्पष्ट करता येईल. आकडेवारीच्या आधारे विकास होत असतांना दिसतो. परंतू प्रश्न असा आहे की, देशामध्ये विकास कोणाचे होतो आहे. कोटी दारिद्र्यात जीवन जगत असणाऱ्या भारतीयांचा का 15 टक्के असणाऱ्या भांडवलदार आणि शासक–प्रशासकांचा?

### आर्थिक वृध्दी दर आणि दारिद्र्य दर्शविणारा तक्ता:

| योजना | कालावधी | आर्थिक वृध्दी दर | दारिद्र्याचे प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| 1 | 1951–56 | 3.6 | NA |
| 2 | 1956–61 | 4.2 | 41 (रथ व दांडेकर समिती) |
| 3 | 1961–66 | 2.8 | 41 (रथ व दांडेकर समिती ) |
| 4 | 1969–74 | 3.3 | 41 (रथ व दांडेकर समिती ) |
| 5 | 1974–78 | 4.7 | 46.3(साहावी योजना समिती ) |
| 6 | 1980–85 | 5.7 | 48.2(साहावी योजना समिती ) |
| 7 | 1985–90 | 5.8 | 42.7(मिन्हास ,जैन व तेंडूलकर समिती ) |
| 8 | 1992–97 | 6.8 | 29.2(विषेश गृप) |
| 9 | 1997–02 | 5.5 | 26.1 |
| 10 | 2002–07 | 7.8 | 27.5 |
| 11 | 2007–2012 | 8.2 | 29.6(सी रंगराजन पॅनल) |
| 12 | 2012–17 | 8.0(संकल्पीत) | 29.6(सी रंगराजन पॅनल) |

स्त्रोत : भारतीय अर्थव्यवस्था, दत्त व सुंदरम.

वरील तक्त्याचे विश्लेषण केले असता लक्षात येते की भारताचा आर्थिक वृध्दीदर सातत्याने वाढत आहे तो 3.6 टक्के वरून 8.2 टक्के पर्यंच झाला आहे. या वृध्दी दराच्या आधारे भारतीय अर्थव्यवस्था जगात 6 व्या क्रमांकाची बनली आहे. हे नुकतेच प्रसिध्द झालेल्या फोर्ब्स नियतकालीकाने आपल्या अहवालात सांगितले. या वृध्दीदराच्या प्रगती आधारे भारतातील दारिद्र्य नष्ट व्हायला पाहिजे होते. भारतातील दारिद्र्य आजही टिकून आहे. कारण भारतामध्ये सर्वसमावेशक विकास व्हायला पाहिजे होता. तो न झाल्यामुळे 11व्या पंचवार्षिक योजनेत सर्वमावेशक वृध्दी म्हणजे सर्वांना सामावून घेणारी वृध्दी होय म्हणजेच दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या, विशेषतः

अनुसूचित जाती–जमाती इतर मागासवर्गीय व अल्पसंख्यांक, यांच्या जीवनाच्या गुणवत्तेत मोठी सुधारणा होण्याच्या दृष्टीने आर्थिक वाढ त्यांच्या पर्यंत झिरपत जाणे होय. अशा प्रकारची आर्थिक वृध्दीची वाढ व्हायला पाहिजे होती. परंतू तशा प्रकारची आर्थिक वृध्दी न झाल्यामुळे भारतातील दारिद्र्य नष्ट होवू शकले नाही.

भारताच्या आर्थिक वृध्दी मध्ये झालेली वाढ ही फोर्ब्सने जाहीर केलेल्या श्रीमंताच्या सर्वे वरून लक्षात येईल. फोर्ब्सने 2017 चा अहवाल सादर केला त्यामध्ये जगाच्या श्रीमंताच्या यादीत भारताचे 100 लोक आहेत. म्हणजेच जवळपास 7.5 अब्ज लोकांपैकी 100 लोक भारतीय आहेत. हा फार मोठा विरोधाभास आहे. त्यामुळे भारतामध्ये अती श्रीमंत लोक श्रीमंत आहेत. तर गरीब लोक गरीबीत जीवन जगत आहेत. भारताच्या आर्थिक वृध्दीमागे या श्रीमंतलोकांच्या संपत्तीचा जास्त वाटा आहे. त्यामुळे भारताच्या वृध्दी दरात वाढ होताना दिसते. परंतू त्यामुळे दारिद्र्य नाहीसे होण्याला मदत होत नाही. हे भारताचे वास्तव आहे.

## निष्कर्ष व शिफारसः

भारतामध्ये श्रीमंत व्यक्ती श्रीमंत होत आहेत व गरीब व्यक्ती गरीब होत आहेत. या दोघांमधील दरी वाढतच आहे. आपल्याला जर भारतातील दारिद्र्य नष्ट करायचे असेल तर या दोघांमधील दरी कमी करावी लागेल. त्यासाठी भारताच्या अंदाजपत्रकात दारिद्र्य नष्ट करण्यासाठी विशेष तरतूद करावी लागेल. उद्योगाचे व शेतीचे राष्ट्रीयकरण करून ही दरी दुर करता येते. त्याचप्रमाणे शिक्षणाचा दर्जा उंचावून सुध्दा ही दरी दुर कमी करता येवू शकते आणि कोठारी आयोगाने सांगितलेल्या शिफारसीनुसार म्हणजेच जी.डी.पी च्या 4टक्के खर्च शिक्षणावर झाला तर गरीबीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. कारण शिक्षणामुळे माणूस आत्मनिर्भर होतो. या आत्मनिर्भर झालेल्या लोकांना सरकारने शेतीमध्ये आणि उद्योगामध्ये समाविष्ठ केले पाहिजे. त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नातून खर्च वजा करून जे उत्पन्न मिळेल ते सरकारने सर्वांमध्ये समान वाटप करावे असे झाल्यास देशाच्या आर्थिक वृध्दी बरोबर दारिद्रय नष्ट होवून देश संपन्न पूर्ण होईल असे वाटते.

## संदर्भ ग्रंथ :


1. दत्त व सुन्दरम, भारतीय अर्थव्यवस्था एस. चन्द एण्ड कम्पनी ली. रामनगर, नईदिल्ली,2011.
2. मोरे एफ. सी. अनुसूचित जातीच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाची समस्या ती सोडविण्याचे उपाय, मुलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट पुणे, 2013.
3. थोरात सुखदेव, दलित निरंतर दारिद्र्य आणि विषमता, सुगावा प्रकाशन पुणे,2007
4. www.forbes.com
5. दैनिक लोकसत्ता दिनांक 22–3–2017.




**राजरत्न भिमराव पोहेकर**
**संशोधक विद्यार्थी , उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव.**